# CRISIS INTERVENTION CENTRE FOR WOMEN

Sometimes, we visit the hospital for treating various complaints, such as injuries, aches and pains or serious injuries like burns. At times, there is no physical illness, but we feel stressed due to financial problems at home, or when our family members mistreat us. These worries lead to health complaints like sleeplessness, headaches, frequent dizziness, and problems related to menstruation. The pressure may mount to such an extent that we feel like ending our lives.

When we visit the hospital for treating any of these complaints, healthcare providers ask us to specify reasons while filling case papers. Some of us are able to say that we were hit by our husband; some of us may have even have filed a complaint with the police before visiting the hospital. But most of us often hesitate to say that our husband, parents or close relatives have beaten us. It is not easy to admit that our in-laws or parents make us feel oppressed. We say instead, that we were hurt in an accident.

The 'Crisis Intervention Centre for Women' at the Asilo North Goa District Hospital, offers women the space to talk about difficulties under the assurance of confidentiality – the information will not be shared with others. This centre has been set up as a joint initiative of the Asilo North Goa District Hospital and Centre for Enquiry into Health and Allied Themes (CEHAT), Mumbai. There are trained, sensitized professionals to confide in and help you find a way out of the difficult situation. Women can seek their advice, avail of legal redress, police intervention, temporary shelter for one or two days in situations of emergency, and get current information on new laws passed by the government through this centre.

In order to put an end to the violence that women and girls face at home from their family members, the Government of India enacted the **Protection of Women from Domestic Violence Act, 2005**. Under this Act, women are entitled to protection irrespective of caste or religion. Whether you are facing violence from in-laws, parents or any other relative, you can avail of help under this law. If there are difficulties that prevent you from seeking legal remedies by yourself, this law makes it possible for another person to do so on your behalf. We often fear that by speaking out against violence, we may stand to lose the roof over our heads. However, with the help of this law, it is possible to continue living in the same house and resisting violence. This law aims to empower women.

Each one of us wishes to live in a home free from violence; the Crisis Intervention Centre for Women is making an effort towards this, guided by the motto that 'No one has the right to inflict violence on another person'. The Crisis Intervention Centre for Women is committed to work with women to reduce loneliness and instil greater confidence.

(Asilo)/ North Goa District Hospital, O.P.D. No. 33, Near Pharmacy, Mapusa Goa - 403507.
Time: Mon To Fri 9:00 a.m. to 4:30 p.m.
Sat. 9:00 a.m. to 12:30 noon
**Phone: 0832 2254444 (Casualty Dept.) / 0832 2262211**

# स्त्री अत्याचार निवारण विभाग

कधी हातापायाला जबर दुखापत झाली म्हणून, मुका मार लागला म्हणून किंवा कधी भाजले म्हणून तुम्ही दवाखान्यात येता. काही वेळा कोणतीच शारीरिक दुखापत नसते, पण घरात खाण्या-पिण्याची आबाळ होते, घरातील माणसे नीट बोलत नाहीत, मग मानसिक ताण येतो. साहजिकच झोप न येणे, सतत चक्कर येणे, मासिक पाळीच्या वेळी त्रास होणे अशा तक्रारी सुरु होतात. काही वेळा गोष्टी इतक्या असह्य होतात की जीवनाचा शेवटही करावासा वाटतो.

या सर्वांसाठी तुम्ही जेव्हा दवाखान्यात येता, तेव्हा केस पेपर काढताना तुम्हाला कारणं विचारली जातात. काही जणी 'नवऱ्याने मारले' असे सांगतात, त्या आधी काही जणी पोलिस स्टेशनमध्येही गेलेल्या असतात. पण बऱ्याच जणींचे मन 'नवऱ्याने मारले' - 'माहेरच्यांनी मारले' असे सांगताना कचरते. सासरच्यांनी, घरातल्यांनी कोंडमारा केला असे सांगण्यास त्या धजावत नाहीत. 'अपघाताने असे झाले' असे सांगतात.

मात्र आता आपल्या दु:खाला वाट मोकळी करुन देण्यासाठी 'स्त्री अत्याचार निवारण' विभागाच्या रुपात आझिलो नोर्थ गोवा डिस्ट्रिक हॉस्पिटलमध्ये एक जागा साकारली आहे. हा विभाग 'आझिलो नोर्थ गोवा डिस्ट्रिक हॉस्पिटल' आणि 'सेहत' यांच्या संयुक्त विद्यमाने साकार झाला आहे. स्त्री अत्याचार निवारण विभागात येऊन तुम्ही आपली खरी समस्या मांडू शकता. येथे तुमच्याशी बोलायला, कठीण परिस्थितीतून वाट काढायला संवेदनशील, अनुभवी जाणकार असतील. तुम्हाला त्यांचा सल्ला मिळेल. याशिवाय, वकिली सल्ला, पोलिसांची मदत व प्रसंगी एक-दोन दिवसाचा तात्पुरता निवारा यासाठीही 'स्त्री अत्याचार निवारण विभाग' मदत करेल. याच्या जोडीला सरकारने नव्याने केलेल्या कायद्याची माहिती आपल्याला स्त्री अत्याचार निवारण विभागामध्ये मिळू शकेल.

मुली व स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसा रोखण्यासाठी भारत सरकारने **'कौटुंबिक हिंसेविरोधी स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा २००५'** अंमलात आला आहे. तुम्ही कोणत्याही जाती-धर्माच्या असलात तरी तुम्हाला या कायद्याअंतर्गत मदत मिळू शकते. तुमच्यावर सासर-माहेर किंवा इतर जवळचे नातेसंबंध असणाऱ्यांकडून जर हिंसा होत असेल तर तुम्ही या कायद्याची मदत घेऊ शकता. कधी कधी परिस्थिती इतकी बिकट असते की तुम्ही स्वत: दाद मागू शकत नाही तेव्हा इतर कोणीही तुमच्या बाजूने ह्या कायद्याद्वारे दाद मागू शकतात. बऱ्याचदा स्त्रियांना मुख्य भीती असते की, आपल्यावर होणाऱ्या हिंसेविरुद्ध बोलल्यास आपल्या डोक्यावरचे छप्पर जाईल परंतु या कायद्याची मदत घेऊन तुम्ही त्याच घरात राहून तुमच्यावर होणाऱ्या हिंसेला प्रतिबध्द करु शकता. आता आपले हात बळकट झाले आहेत कारण या कायद्याचे पाठबळ आपल्याला मिळाले आहे.

प्रत्येकीला हिंसेपासून,मारझोडीपासून, त्रासापासून मुक्त कुटुंब हवे आहे. त्यासाठी 'स्त्री अत्याचार निवारण विभाग' प्रयत्न करत आहे. 'कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर हिंसा करण्याचा अधिकार नाही' हेच स्त्री अत्याचार निवारण विभागाचे ब्रीद आहे. स्त्री अत्याचार निवारण विभागात आल्याने एकटेपण कमी होऊन तुमचा जगण्याचा आत्मविश्वास वाढावा, यासाठी हा विभाग तत्पर आहे.

(आझिलो)/नोर्थ गोवा डिस्ट्रिक हॉस्पिटल, ओ.पी.डी. क्र. ३३, फार्मसी जवळ, म्हापसा गोवा - ४०३५०७.
वेळ : सोम. ते शुक्र. स. ९:०० ते सायं. ४:३०
शनि. स. ९:०० ते दुपारी १२:३०
**फोन : ०८३२ २२५४४४४ (अपघात विभाग)/ ०८३२ २२६२२११**